# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

## माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा एप्रिल- मे २०२१

विद्यार्थ्यांसाठी असलेले आरोग्य व शारीरिक शिक्षण विषयाची परीक्षा दोन्ही सत्रांत न घेता एकाच म्हणजे द्विवतीय सत्रात घ्यावी. प्रात्यक्षिक व लेखन कार्य प्रत्येकी ५० गुणांची परीक्षा घेऊन मिळालेल्या १०० गुणांपैकी प्रचलित पद्धतीनुसार श्रेणी देण्यात यावी.

सदर विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा व लेखन कार्य इ. घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित माध्यमिक शाळांना राहिल. त्यामुळे सदर परीक्षेचे शालेय स्तरावर आयोजन करुन त्याचे मूल्यांकन विभागीय मंडळाकडे जमा करावे.

<table>
<tr><th colspan="5">नियमित मूल्यांकन पध्दत</th><th colspan="4">एप्रिल-मे २०२१ साठी मूल्यांकन पध्दत</th></tr>
<tr><td colspan="5">प्रथम सत्र<br>प्रात्यक्षिक कार्य = ५० गुण<br>लेखन कार्य = ५० गुण<br><br>द्विवतीय सत्र<br>प्रात्यक्षिक कार्य = ५० गुण<br>व लेखन कार्य = ५० गुण<br>याप्रमाणे परीक्षा घेऊन</td><td colspan="4">एकाच सत्रात<br>खालीप्रमाणे परीक्षा घेऊन मिळालेल्या प्राप्त गुणांनुसार श्रेणी देण्यात यावी.</td></tr>
<tr><td>प्र. सत्र</td><td>द्वि. सत्र</td><td>एकूण गुण</td><td>सरासरी</td><td>श्रेणी</td><td>प्रात्यक्षिक कार्य</td><td>लेखन कार्य</td><td>एकूण गुण</td><td>श्रेणी</td></tr>
<tr><td>१००</td><td>१००</td><td>२००</td><td>१००</td><td></td><td>५०</td><td>५०</td><td>१००</td><td></td></tr>
<tr><td colspan="5"></td><td colspan="4">ज्या विद्यार्थ्यांचे लेखन कार्य अपूर्ण राहिले आहे त्यांचेकडून उशिरात उशिरा १० जूनपर्यंत जमा करुन घ्यावे<br><br>प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अभ्यासक्रमानुसार १० घटकांपैकी कोणत्याही ०५ घटकांची निवड करावी.<br>दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक परीक्षा न घेता लेखन कार्य पूर्ण करुन घ्यावे व प्रचलित पद्धतीनुसार त्यांना श्रेणी (H) देण्यात यावी.</td></tr>
</table>

कोविड-१९ ची परिस्थिती पाहता सर्व शासन नियमांचे पालन करुन मुख्याध्यापक व संबंधित विषय शिक्षकांनी परीक्षेचे आयोजन करावे.

**मार्गदर्शक सूचना –** कमीत कमी विद्यार्थ्यांच्या बॅचेस करुन शारीरिक अंतर ठेवून गटागटाने प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात याव्यात. कॅामन साहित्याचा वापर टाळून वैयक्तिक स्वरुपाच्या क्षमता प्रात्यक्षिके घेण्यात यावीत. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणारे शक्य होईल ते साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणण्याचा प्रयत्न करावा. उदा. स्किपिंग रोप, योगा मॅट/सतरंजी इ.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे

**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा एप्रिल- मे २०२१**

**आरोग्य व शारीरिक शिक्षण विषय लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा कार्य**

**या विषयाची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा नवीन मूल्यमापन आराखडयानुसार होईल.**

सदर विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा व लेखी परीक्षा मूल्यांकन इ. घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना राहिल. त्यामुळे सदर परीक्षेचे दिनांक १०/०६/२०२१ पर्यत कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर आयोजन करुन त्याचे मूल्यांकन विभागीय मंडळाकडे सादर करावे.

| नियमित मूल्यांकन पध्दत | एप्रिल -मे २०२१ साठी मूल्यांकन पध्दत |
|---|---|
| लेखी परीक्षा = २५ गुण(द्वितीय सत्रात अनिवार्य ) | लेखी परीक्षा = २५ गुण(द्वितीय सत्रात अनिवार्य ) प्रचलित अभ्यासक्रम २०१३ वर आधारित |
| प्रात्यक्षिक परीक्षा = २५ गुण<br><br>प्रात्यक्षिक १.आरोग्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता(गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक २. कौशल्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ३. उपलब्ध असलेल्या सांघिक खेळापैकी एका खेळाची निवड करुन क्रीडा कौशल्य सादरीकरण घेणे. (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ४. योग व प्राणायम (गुण ५)<br>दोन आसने (प्रत्येकी २ गुण)<br>प्राणायम -(१ गुण)<br><br>५. विविध क्रीडा स्पर्धेतील सहभाग /तासिका उपस्थिती /पुस्तक लेखन कार्य (गुण ५) | प्रात्यक्षिक परीक्षा = २५ गुण<br><br>प्रात्यक्षिक १.आरोग्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता(गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक २. कौशल्याधिष्ठित शारिरीक क्षमतेवर आधारित कोणतीही एक क्षमता (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ३. विद्यार्थी पारंगत असलेल्या खेळाची अथवा उपलब्ध असलेल्या सांघिक खेळापैकी एका खेळाची निवड करुन क्रीडा कौशल्य सादरीकरण घेणे. (गुण ५)<br><br>प्रात्यक्षिक ४. योग व प्राणायम (गुण ५)<br>दोन आसने (प्रत्येकी २ गुण)<br>प्राणायम -(१ गुण)<br><br>५. विविध क्रीडा स्पर्धेतील सहभाग /तासिका उपस्थिती /पुस्तक लेखन कार्य (गुण ५) |

लेखी परीक्षा २५ गुण + प्रात्यक्षिक परीक्षा २५ गुण असे एकूण ५० गुणांपैकी मिळालेल्या गुणांचे श्रेणीत रुपांतर करण्यात यावे.

**मार्गदर्शक सूचना –** कमीत कमी विद्यार्थ्यांच्या बॅचेस करुन शारीरिक अंतर ठेवून गटागटाने प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात याव्यात. कॅामन साहित्याचा वापर टाळून वैयक्तिक स्वरुपाच्या क्षमता प्रात्यक्षिके घेण्यात यावीत. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणारे शक्य होईल ते साहित्य विद्यार्थ्यांनी स्वतः आणण्याचा प्रयत्न करावा. उदा. स्किपिंग रोप, योगा मॅट/सतरंजी इ.